(२०)

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नाशिक

(गृह शाखा)

फोननं.0253-2319006

ई मेल –gruhshakha@gmail.com

क्र.कक्ष-1/पिओएल - 2/कावि/270/2023

दिनांक:- 24 /04/2023

## अधिसूचना

मा. संचालक अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, नाशिक यांनी विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तात्पुरत्या स्वरुपात पॅनल तयार करणेकामी प्रस्ताव सादर केला आहे. नाशिक जिल्हयातील न्यायालयांची संख्या व सध्या कार्यरत असलेले नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची संख्या लक्षात घेता फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च्या कलम 25 (3) अन्वये विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची तात्पुरत्या स्वरुपात नव्याने नियुक्ती करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 कलम 25 (3) व महाराष्ट्र शासनाच्या सहाय्यक अभियोग संचालनालयातील सहाय्यक सरकारी अभियोक्ता गट अ (सेवा प्रवेश) (सुधारणा) नियम 2009 अन्वये जिल्हा दंडाधिकारी यांनी शासनास त्यांच्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या नियुक्तीसाठी अभियोक्त्यांची नामिका (पॅनल) तयार करणे आवश्यक आहे.

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदावर महाराष्ट्र विधी अधिकारी (नियुक्ती सेवेच्या शर्ती व मोबदला) नियम 1995 अन्वये तयार केलेले महाराष्ट्र शासनाच्या सहाय्यक अभियोग संचालनालयातील सहाय्यक सरकारी अभियोक्ता गट अ (सेवा प्रवेश)(सुधारणा) नियम 2009 अन्वये खालील प्रमाणे पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे.

1. भारतीय नागरिक्तव,

2. वयोमर्यादा,

- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा 18 वर्षे व कमाल वयोमर्यादा 40 वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत किमान वयोमर्यादा 18 वर्षे व कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी. (सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. सनिव 2023/प्र.क्र.14/कार्या 12 दि. 3/03/2023 अन्वये)

3. ज्यांनी कायद्याची पदवी धारण केलेली आहे, आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र - गोवा यांचे वकील म्हणुन नोंदणी केलेली आहे.

4. ज्यांनी उच्च न्यायालय किंवा त्यांच्या दुय्यम न्यायालयांमध्ये कमीतकमी 5 वर्षे वकीलीचा अनुभव प्राप्त केलेल आहे.

५. नियम 3 च्या उपखंड (तीन) मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर आयोगाचे असे मत असेल की, विहीत अनुभव अनुसुचित जाती व जमातीच्या, विमुक्त किंवा भटक्या जमातीच्या उमेदवाराकरीता राखुन ठेवलेली रिक्त पदे भरण्याकरीता आवश्यक अनुभव असणारे पुरेसे अमेदवार उपलब्ध नाहीत तर, आयोगाला अशा निवडीच्या बाबतीत त्यात नमुद केलेली अनुभवाच्या कालावधीबाबतची अट शिथील करता येईल आणि अशा जातीच्या किंवा जमातीचया योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

६. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता ही पदे पुर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने आरक्षण निश्चित करण्यात आलेले नाही.

पात्र असलेल्या अभियोक्त्यांकडुन सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. सदरचे अर्ज हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह जिल्हादंडाधिकारी नाशिक यांचे कार्यालयात दि. १० / ०५ /2023 पावेतो सादर करावेत. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार होणार नाही.

**अटी व शर्ती**

1) विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणुक ही पुर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणतीही पूर्व सूचना न देता केव्हाही संपुष्टात आण्ण्यात येईल.
2) विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या नेमणुका फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 25 (3) मधील तरतुदीनुसार विशिष्ट फौजदारी प्रकरणासाठी असली तरी त्यास नेमुन दिलेल्या न्यायालयातील बोर्डावरील दैनंदीन फौजदारी प्रकरणे हैंताळणे आवश्यक राहील.
3) विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्याचे काम असमाधानकारक असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्यांचे विरुध्द तक्रार प्राप्त झाल्यास त्यांना कोणतीही सूचना न देता त्यांची नेमणुक रद्द करण्यात येईल.
4) विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना अन्य कोणत्याही प्रकरणांत खाजगी व्यक्तीतर्फे खटल्यात काम करता येणार नाही.
5) विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्याने पार पाडलेल्या न्यायालयीन कामकाजाबाबतचा मासिक अहवाल सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांचेकडेस सादर करावा.
6) जिल्हयाचे सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता हे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता हे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे पर्यवेक्षी व नियंत्रण अधिकारी असतील व त्यांचे सूचनेचे पालन करणे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांवर बंधनकारक असेल.
7) विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणुन शासनाचा पुर्णवेळ सेवक म्हणुन नियुक्ती नसल्याने कितीही वर्ष काम पाहीले तरी त्यांना नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्ता

पदावर हक्क सांगता येणार नाही तसेच सदर कालावधीचा फायदा अन्य कोणत्याही शासकीय पदाच्या नियुक्ती कामी वयोमर्यादेतील सुट म्हणुन घेता येणार नाही.

8) विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना शासकीय पदाचे कोणतेही लाभ अथवा फायदे अनुज्ञेय असणार नाही.

9) विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना खालीलप्रमाणे मानधन मंजुर करण्यात यावे.

| | |
|---|---|
| अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणीसाठी फी | रु. 1200/- |
| ब) एका जामिन अर्जाच्या विरोधाकरीता | रु. 800/- |
| क) प्रतिदिन एकुण कमाल मर्यादा | रु. 2000/- |

(एकापेक्षा जास्त सुनावणी किंवा जामिन अर्जाच्या विरोधाचे काम चालविले तरी प्रतिदिन कमाल मर्यादा रु. 2000/- राहील)

उपरोक्त अटी व शर्तीनुसार विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करण्यात येणार आहे. याची कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**जिल्हादंडाधिकारी नाशिक**

**प्रति** :-

1) मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश नाशिक यांचेकडेस माहिती व कार्यालय नोटीस फलकावर प्रसिध्दी करणेसाठी सादर.
2) मा. जिल्हा व अपर सत्र न्यायाधीश मालेगाव जि. नाशिक यांचे कडेस त्यांचे कार्यालयाचे नोटीस फलकावर प्रसिध्दीसाठी सादर.
3) मा. जिल्हा व अपर सत्र न्यायाधीश निफाड जि. नाशिक यांचे कडेस त्यांचे कार्यालयाचे नोटीस फलकावर प्रसिध्दीसाठी सादर.
4) सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता नाशिक यांचे कडेस त्यांचे नोटीस फलकावर प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
5) जिल्हा सरकारी वकील नाशिक, निफाड, मालेगाव यांचेकडेस त्यांचे कार्यालयाचे नोटीस फलकावर प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
6) अध्यक्ष नाशिक जिल्हा बार कौन्सिल नाशिक जिल्हा व सर्व तालुका वकील संघ यांचेकडेस माहिती व कार्यालय नोटीस फलकावर प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
7) तहसिलदार (सर्व) यांचेकडेस त्यांचे कार्यालयीन नोटीस फलकावर प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

८) मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, नाशिक व सर्व मा. तालुका न्यायदंडाधिकारी यांचेकडेस त्यांचे कार्यालयीन नोटीस फलकावर प्रसिध्दीसाठी अग्रेषित

९) मा. संचालक अभियोग संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडेस माहितीसाठी सादर.

जिल्हादंडाधिकारी नाशिक

# Application for the post of Special Public Prosecutor

[Section 25(3) of Criminal Procedure Code 1973]

| For Office Use Only |
|---|
| Application No.- |
| Application Received on - |

Latest/ recent Colour Photo of the applicant

1. Full name of the applicant, Surname first (In Block Capital Letters)

   Father's/Husband's Name

2. Address

| Permanent address | Temporary address |
|---|---|
| Room/Flat/Bldg.No.- | Room/Flat/Bldg.No.- |
| Road- | Road- |
| Village/Post- | Village/Post- |
| Taluka- | Taluka- |
| District/City- | District/City- |
| State- | State- |
| PIN- | PIN- |
| E-mail - | E-mail - |
| Mobile No. | Mobile No. |

3. (a) Date of birth :-
   (b) Age on the date of advertisement :-

4. Category (Open/Reserved) [Not Applicable] :-

5. Place of birth :-

6. PAN number :-

7. Aadhar Number :-

8. Whether candidate is domiciled in the State of Maharashtra :-

9. Whether enrolled as member of the Bar Council of Maharashtra and Goa (Specify the registration no. & date)

10. **Education qualification and experience**

(a) **Details of the examination passed for graduate, Law graduate, Post- graduate**

| Name of the examination | Name of University | Class/Div. | Year of Passing |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

(b) Total number of years of practice :-

| Name of the Courts where practiced | Total No. of Civil matters Conducted | Total No. of Criminal matters Conducted | Total No. of Service matters conducted |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

(c) Total number of Sessions Cases and Criminal Appeals & Revisions personally conducted before the Sessions Court. (Please specify the number of cases) :-

11. Previously worked as Special Public Prosecutor ? If any :-

| Post held | Date of Joining | Date of leaving | Reasons for Leaving |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

12. Languages known :-

| Language | Hindi | English | Marathi |
|---|---|---|---|
| Read | | | |
| Write | | | |
| Speak | | | |

13. Have you ever been arrested/detained/prosecuted :- Yes/No
Bound down/convicted/faced any criminal
Prosecution by in a Court of Law for any offence
If yes, give details thereof :-

14. Whether you are facing/have ever faced any Disciplinary action from the Bar Council of India or Bar Council of Maharashtra and Goa or any Bar Association or any other professional body. :- Yes/No

## DECLARATION

1. I have not been compulsorily retired, removed or dismissed from judicial service or from service in Government of Statutory or Local Authority or failed to complete probation period in judicial service on any post or in Government or Local Authority.
2. I have not been convicted of an offence involving moral turpitude.
3. I have never been permanently debarred or disqualified by any Public Service Commission or Government Department/Body or District Court or High Court from appearing for any examination or selection conducted for the purpose of recruitment.
4. **I do hereby affirm that all the details filled up in the application are true and correct as per my knowledge, my appointment as a Law Officer, if made shall stand automatically cancelled and I shall be liable for further necessary action.**

**Date :-**

Signature of the Applicant

**Place :-**

N.B.

1. Candidate shall append the true copies testimonials/certificates and document, duly attested. (Self-attested copies may also be considered)
   i. Educational Certificates
   ii. Proof of Date of Birth
   iii. Experience Certificate
   iv. Copy of Degree
   v. Other documents in support of claims.
2. The applicant shall affix his recent passport size colour photograph with his signature thereon.
3. Unsigned applications, applications not properly filled up by the candidates and applications without necessary enclosures are liable to be rejected summarily.

---